PUNE RESEARCH TIMES (ISSN 2456-0960)
AN INTERNATIONAL JOURNAL OF CONTEMPORARY STUDIES SPECIAL ISSUE OCT 2018

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे भारतातील स्त्रीयांच्या उध्दारासाठी योगदान

**डॉ गोपाळसिंग बच्छिरे**
(इतिहास विभाग प्रमुख) सिध्दार्थ महाविद्यालय, जाफ्राबाद, जि.जालना
महाराष्ट्र भारत

**विजय साहेबराव साळवे**
(इतिहास विभाग)
डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद
महाराष्ट्र भारत

## प्रस्तावना (Introduction):-

उभारलेला लढा हा जगाच्या इतिहासात मानव मुक्तिचा लढा ठरला आहे.परंपरेने गुलामीत बंदिस्त झालेली भारतीय स्त्री सुध्दा बाबासाहेबांच्या मानव मुक्तीचे ध्येय होते. भारतातील विषमतेच्या प्रश्नाला जसे वर्ण व्यवस्था व जातीवादाचे अभिन्न स्तर आहेत. तसेच स्त्री मुक्तीच्या प्रश्नाला ही ते आहेच अशी मौलिक मांडणी बाबासाहेबांनीच सर्व प्रथम केली”१

बाबासाहेबांनी छत्रपती शिवाजी महाराज व महात्मा ज्योतीबा फुले यांचा स्त्री विषयी असलेला दृष्टीकोन स्विकारुन भारतातील स्त्रीयांसाठी महान असे भरीव कार्य केलेले आहे.बाबासाहेबांनी भारतातील केवळ दलित, मागासवर्गिय, गरिब स्त्रीयांचाच उध्दार केला नाही तर अखिल स्त्री वर्गाचा मग ती स्त्री कोणत्याही जाती, धर्माची, प्रदेशाची, वंशाची असो. स्त्री वर्गाच्या उध्दाराविषयी बाबासाहेबांचा विशाल व महान दृष्टिकोन होता. बाबासाहेबांनी स्त्री वर्गाच्या उध्दारासाठी त्यांच्या सर्वांगिण विकासासाठी सर्व प्रथम स्त्रीयांवर गुलामी, दास्य लादणा-या वाईट, अमंगल, अमानवी प्रथा, परंपरा यांचा सुक्ष्म चिकित्सक पध्दतीने अभ्यास केला. मनुस्मृतीसह सर्व धार्मिक ग्रंथाची कठोर चिकीत्सा केली. मनन, चिंतन करुन आपल्या भाषणाच्या, लिखाणाच्या माध्यमातुन त्यांनी सर्वप्रथम आपले स्त्री वर्गाविषयी विचार मांडले,

समाज जागृती केली वाईट चाली रिती, रुढी, परंपरा, पध्दती, व्यवस्था यावर कडाडुन टीका केली.

बाबासाहेबांनी भारतातील स्त्रीयांच्या मानव अधिकारासाठी, त्यांच्या कल्याणासाठी, त्यांच्या सर्वांगिण विकासासाठी केवळ विचारच व्यक्त केले नाहीत तर भारतीय संविधानाच्या माध्यमातुन संविधानात तरतुदीही करुन ठेवल्या आहेत. एवढे मोठे महान योगदान बाबासाहेबांचे स्त्रीयांसाठी आहे. परंतु भारताची शोकांतिका हि आहे कि भारतातील फार कमी स्त्रीया अज्ञानामुळे म्हणा किंवा जातीय व्देषामुळे म्हणा बाबासाहेबांचे भारतातील स्त्रीयांसाठी योगदान मानतात.

**संशोधनाची उद्दिष्ट्ये** (Objective of the research):-

१) भारतातील अखिल जाती, धर्माच्या, प्रदेशाच्या महिलांना जाणीव करुन देणे कि स्त्रीयांच्या कल्याणासाठी त्यांच्या, मानव अधिकारासाठी बाबासाहेब रात्रंदिवस झटलेले आहेत.

२) स्त्री वर्गाविषयी बाबासाहेबांचा असलेला दृष्टिकोन सांगण्यासाठी.

३) स्त्री वर्गाविषयी बाबासाहेबांचे विचार व अखिल स्त्री वर्गासाठी बाबासाहेबांनी केलेले महान कार्य सांगण्यासाठी.

४) आज भारतातील अखिल जाती, धर्माच्या, प्रदेशाच्या, वंशाच्या स्त्रीया राजकारणात, शासकिय नोकरी, खाजगी संस्था अर्थात भारतात व भारताबाहेर जगात जी पदे भुषवित आहेत ते कोण्या देवी, देवतांच्या कृपेमुळे नाही तर केवळ महात्मा फुले व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या महान विचार व कार्यामुळेच हे सांगण्यासाठी.

५) बाबासाहेबांकडे पाहण्याचा काही स्त्रीयांचा संकुचित दृष्टिकोन बदलण्यासाठी.

**संशोधक पध्दती** (Research Method):-

प्रस्तुत संशोधनासाठी निदानात्मक पध्दती (Dignostic Research Method) चा उपयोग करण्यात आला आहे ज्या मध्ये प्राथमिक व दुय्यम साधन सामग्रीचा वापर करण्यात आला आहे( विविध संदर्भ ग्रंथ, नियतकालीके, पाक्षिके, मासिके, वर्तमान पत्रातील लेख, शासकिय ग्रंथ, इलेक्ट्रॉनिक भाषणे इत्यादी)

**संशोधनाचे महत्व** (Significant of Research) **:-**

१) प्रस्तुत संशोधनाचे महत्व असे आहे कि बाबासाहेबांचा स्त्रीयांकडे पाहण्याचा जो महान व विशाल दृष्टिकोन आहे तसा समाजातील, भारतातील लोकांचा व स्त्रीयांचा विचार होण्यासाठी

२) बाबासाहेबांच्या स्त्रीविषयी कार्याची स्फुर्ती, प्रेरणा घेवुन आदर्श भारतीय स्त्री निर्मिती साठी

३) भारतातील तसेच जगातील सरकारने बाबासाहेबांच्या स्त्रीयाविषयी केलेल्या विचार व कार्यांची स्फुर्ती घेवुन अखिल स्त्री वर्गाच्या अधिक कल्याण व विकासासाठी प्रस्तुत संशोधनाचे महत्व आहे

४) बाबासाहेबांविषयी समाजातील, भारतातील किंबहुना जगातील काही लोकांचे असलेले गैरसमज संकुचित वृत्ती, मानसिकता बदलण्यासाठी

५) बाबासाहेबांनी जिवनाच्या अनेक क्षेत्रात भरीव कार्य केले आहे त्याच बरोबर भारतातील स्त्री वर्गाच्या मानव अधिकारासाठी त्यांना गुलामगीरी, दास्यातुन, वाईट चालीरीती, परंपरा, रुढी, पध्दती, व्यवस्थेतुन मुक्त करण्यासाठी अहोरात्र किती कष्ट घेतले आहेत तसेच किती हालअपेष्टा सोसल्या आहेत. अखिल स्त्री वर्गाच्या कल्याणासाठी बाबासाहेबांची किती तळमळ होती हे भारतातीलच नव्हे तर जगातील लोकांना, स्त्रीयांना समजण्यासाठी प्रस्तुत संशोधन विषया चे महत्व आहे.

**६)** आज बाबासाहेबांमुळेच स्त्रीयांचे आर्थिक, शैक्षणिक, राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक क्षेत्रात सक्षमीकरण घडुन आलेले आहे व सक्षमीकरण घडत आहे.

**मुख्य विषय** (Main theme):-

"वैदिक काळात आणि महाभारत काळापर्यंत महिलांना समान अधिकार(हक्क) होते त्यांना शिक्षणाचा हक्क देखिल पुरुषांच्या बरोबरीने होता गार्गी आणी मैत्रेयी हि उदाहरणे सर्वश्रुत आहेत महिलांना स्वंयवरातुन मनपसंत पति निवडण्याचा अधिकार होता धार्मिक स्वातंत्र्य देखिल होते. परंतु त्यानंतर परिस्थिती बदलत गेली आणि स्त्रियांना मानवी हक्क नाकारण्यात आले. त्यांची स्थिती गुलामाप्रमाणे झाली त्यांना शिक्षणाचा हक्क नाकारण्यात आला अतिरेकी प्रमाणात स्त्री पुरुष भेदभाव सुरु झाला.पुरुषसत्ताक समाज पध्दतीच्या वरवंट्याखाली महिलांचे स्वातंत्र्य भरडले गेले. बालविवाह, पुर्नविवाहास विरोध, विधवा विवाहास विरोध, सती जाणे, मुरळी सोडणे, देवदासी, बहुपत्नीत्व आदी घातक व वाईट, रुढी व परंपरेच्या बेड्या स्त्रीयांच्या पायात ठोकल्या होत्या. १९ व्या शतकापर्यंत हिच परिस्थिती होती.

नतंर महर्षी धोंडो केशव कर्वे, राजाराम मोहन राय, महात्मा ज्योतिबा फुले, सावित्रीबाई फुले, पंडिता रमाबाई, कर्मविर भाउराव पाटिल, गोपाळ गणेश आगरकर यांनी स्त्रीयांच्या उध्दारासाठी व सर्वांगिण विकासासाठी आप आपल्या परीने प्रयत्न केले.

परंतु बाबासाहेबांनी केवळ प्रयत्नच केले नाही तर अखिल जाती, धर्माच्या स्त्री वर्गाला आपल्या विचार, भाषण, लेखनातुन व भारतीय संविधानातील तरतुदितुन त्यांचे नैसर्गिक मुलभुत अधिकार(हक्क) मिळवुन देउन त्यांना दास्यातुन, गुलामगिरीतुन,अन्याय,अत्याचारापासुन मुक्त केले" २

"स्त्रीयांचा सामाजिक चळवळित सहभाग असावा यासाठी १९२७ पासुन शेवटपर्यंत महिलांच्या परिषदा, सभा भरवुन स्त्री शक्तीला जागृत करण्याचा सर्व प्रथम बाबासाहेबांनी प्रयत्न केला. सर्व जाती, धर्मातील स्त्रीया शोषित आहेत स्त्रीयांच्या स्वातंत्र्याच्या जाहिरनाम्या मध्ये बाबासाहेब म्हणाले की लग्नानंतर हि पत्नि पुरुषाची समान अधिकारी

असलेली गृहिणी असली पाहिजे ती नव-याची गुलाम असता कामा नये मुलगा-मुलगी असा भेद करु नये. मुला प्रमाणे मुलीला शिकवुन स्वाभिमानानं व स्वतंत्र बाण्याने जगण्यास शिकवावे.स्त्रीयांच्या प्रगतीवरुन त्या समाजाच्या प्रगतीच मोजमाप ठरतं. या साठी बाबासाहेबांनी स्त्री शिक्षणाचा विचार मांडुन स्त्रीयांच्या शिक्षणावर जास्त जोर दिला”३

कारण कि “एक पुरुष शिकला तर एक व्यक्ती सुधारते पण एक स्त्री शिक्षित झाली तर संपुर्ण कुटुंबाची सुधारणा होते. बाबासाहेब पुरुष आणि स्त्री या दोन्ही घटकामध्ये तत्वत: कोणत्याही स्वरुपाचा भेद करीत नव्हते. संपुर्ण मानव मुक्तीची व निकोप समाज निर्मितीची त्यांची आकांक्षा होती मानव समाजाचा अविभाज्य व तितकाच महत्वाचा भाग या नात्याने बाबासाहेब स्त्री वर्गाकडे पाहत होते स्त्री आणि पुरुष हे दोन्ही घटक मुलत: समसमान आहेत यावर त्यांचा विश्वास होता स्त्री आणि पुरुष या दोन्ही घटकांचा समता तत्वाच्या पायावर विचार केल्याशिवाय नवी विषमता विहिन समाज व्यवस्था निर्माण होवु शकत नाही या मतापर्यंत अभ्यासाअंती ते येवुन पोहोचले होते त्यामुळे स्त्री वर्गाकडे पाहण्याचा बाबासाहेबांचा दृष्टिकोन मोठा वस्तुनिष्ट व निकोप असा सिध्द झाल्याचे दिसुन येते”४

एक भारतीय नागरीक म्हणुन स्त्रीला हि ते सर्व हक्क असावेत जे कि एक पुरुषाला असतात असा बाबासाहेबांचा स्त्रीयांविषयी विचार होता. बाबासाहेबांची स्त्री मुक्तीची वैचारीक पार्श्वभुमी या देशातील तथागत भगवान गौतम बुध्द, महात्मा संत कबीर व महात्मा फुले या तीन गुरुंच्या वैचारिकतेतुन निर्माण झाली आहे. बाबासाहेबांनी स्त्री मुक्तीचा विचार राष्ट्रिय दृष्टिकोनातुन केला ५०% स्त्रीया स्वतंत्र नसतात तो देश अर्धा अधिक गुलाम असतो. “बाबासाहेबांचा मुलींच्या उच्चशिक्षणावर तसेच सहशिक्षणावर जास्त भर होता त्यासाठी वेळोवेळी त्यांनी आपल्या वेगवेगळ्या ठिकाणी केलेल्या भाषणातुन, लेखनीतुन केवळ विचारच मांडले नाहीत तर बाबासाहेबांच्या वडिलांचे सहकारी श्री शिवनाक गौनाक जमेदार जे न्युयार्क ला होते त्यांच्या पत्राच्या उत्तरात बाबासाहेबांनी लिहिले कि तुमच्या मुलीचा मी शिक्षणासाठी गौरव करतो. तिला चांगले शिक्षण द्या असा सल्ला दिला. कु.काशीबाई जाधव या ढोर समाजातील मॅट्रिक नापास मुलीला नर्सच्या कोर्सचा सल्ला देवुन स्वत: खटपट करुन नर्सच्या

PUNE RESEARCH TIMES (ISSN 2456-0960)
AN INTERNATIONAL JOURNAL OF CONTEMPORARY STUDIES SPECIAL ISSUE OCT 2018

कोर्सला केवळ प्रवेशच मिळवुन दिला नाही तर वसतीगृहाची सोय करुन दिली. लोकवर्गणीतुन तिला कपडे आणि इतर आवश्यक साहित्य ही पुरविले तसेच कु.शांता दगडु शिंदे या मुलीचे किर्तनकाराबरोबर होणारे लग्न थांबवुन त्या मुलीला आपल्या घरी आणुन मुलीप्रमाणे संभाळुन तिला शिक्षण देवुन शिक्षिका केले. कु.सुलोचना घटकांबळे या महार समाजातील पहिली मॅट्रिक पास झालेल्या मुलीचे वृत्तपत्रातुन जाहीररीत्या अभिनंदन केले तसेच १९२५ मध्ये सोलापुर येथे मुलींसाठी एक वसतीगृह सुरु केले. वर्धा येथे एका ब्राम्हण शिक्षिकेच्या संगण्यावरुन मुख्याध्यापिकेने एका अस्पृश्य मुलीला शाळेत येण्यास मनाई केली असता बाबासाहेबांनी वृत्पत्रातुन वाचा फोडुन न्याय मिळवुन दिला. १९४५ मध्ये शिक्षणाच्या प्रसारासाठी बाबासाहेबांनी मुंबई येथे पीपल्स एज्युकेशन सोसायटीची स्थापना केली १९४६ मध्ये औरंगाबाद येथे सिध्दार्थ कला व वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाची स्थापना केली. १९५० मध्ये मिलिंद महाविद्यालयाची स्थापना केली”५

२५ डिसेंबर १९२६ रोजीच्या महाडच्या चवदार तळ्याच्या सत्याग्रहावेळी बाबासाहेबांनी दलित परिषदेत स्त्रीयांना उद्देशुन जे भाषण दिले ते इतके प्रेरणा दायक ठरले कि वरिष्ठ वर्गातल्या स्त्रीया ज्या प्रमाणे राहतात, वागतात, वस्त्र दागिने परिधान करतात त्याप्रमाणेच अस्पृश्य व दलित स्त्रीयांनी आपल्या मध्ये बदल केला. आपल्या समाजाच्या भगिनींनी उच्चवर्णिय स्त्रीयांप्रमाणे वागावे, दिसावे आणि स्वाभीमानाने जगावे अशी बाबासाहेबांची आंतरिक तळमळ होती. नवरा व मुले हे दारु पिऊन घरी येत असतील तर त्यांना घरात घेवु नका मुलामुलींना शिक्षण द्या तसेच जुन्या व गलीच्छ चालीरीती सोडुन दिल्या पाहिजेत व त्याचप्रमाणे स्वच्छतेने वगण्याची जबाबदारी घ्या असा सल्ला दिला. मुलींना शिक्षण द्या ज्ञान आणि विद्या या गोष्टी काही पुरुषासाठीच नाहीत तर त्या स्त्रीयांना ही आवश्यक आहे म्हणुन मुलींना शिक्षण दिल्याशिवाय राहु नका”६

१९२७ मध्ये अस्पृश्यांच्या पिण्याच्या पाण्यासाठी बाबासाहेबांनी जो महाड येथे सत्याग्रह केला व १९३० मध्ये अस्पृश्य समाजाला इतरांप्रमाणे मंदिर प्रवेश या साठी नासिक काळाराम मंदिर प्रवेशाचा जो सत्याग्रह केला त्यामध्ये स्त्रीयांच्या हक्काचा ही समावेश केला.

ब्राम्हण, मराठा, राजपुत, ओबीसी स्त्रीयांना सुध्दा विषमतावादी मनुस्मृती ग्रंथाने कोणतेच अधिकार दिलेले नव्हते त्यामुळे बाबासाहेबांनी २५ डिसेंबर १९२७ ला छत्रपती शिवाजी महाराजांची जिथे समाधी आहे त्या रायगड किल्ल्याच्या पायथ्याशी छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकाला विरोध करणा-या विषमतावादी, जातीवादी मनुस्मृती ग्रंथाची होळी करुन महाराजांना आदरांजली वाहिली.

"१६ जुन १९३६ रोजी मुंबई च्या दामोदर हॉल मध्ये भरलेल्या वेश्या आणि मुरळ्या सारख्या स्त्रीयांच्या सभेत बाबासाहेबांनी आपल्या भाषणात सांगितले कि तुम्हाला समजले पाहिजे कि स्त्री जात ही समाजाचा अलंकार आहे प्रत्येक समाज स्त्रीयांच्या चारित्र्याला अधिक मान देतो आपली गृहिणी होणारी स्त्री उत्तम कुलातील असावी अशी प्रत्येक जण अपेक्षा करतो तशी भार्या मिळावी म्हणुन प्रयत्न करतो. कारण आपल्या मुला-बाळांचा कुटुंबाचा,कुळाचा नाव लौकिक स्त्री च्या शिलावर अवलंबुन आहे. त्यामुळे वेश्या व्यवसाय सोडुन लग्न करुन प्रतिष्ठेने जगा सांगितले तसेच ज्या वेश्या लग्न करुन संसार करु इच्छित होत्या त्यांची लग्ने लावुन दिली.तसेच बाबासाहेबांनी स्त्रीमुक्तीच्या संदर्भात कुटुंब नियोजनाचा हि विचार केला"७

"नागपुर येथे १९४२ मध्ये पहिल्या अखिल भारतीय दलित महिला परिषदेत जमलेल्या २०ते २५ हजार महिलांना उद्देशुन भाषण दिले व म्हणाले कि स्त्रीयांच्या संघटनेवर फार मोठा विश्वास ठेवणारा मी माणुस आहे. त्यांना जर विश्वासात घेतले तर समाजाची सुधारणा करण्यासाठी त्या काय काय करु शकतात हे मी जाणतो. दलित वर्गामध्ये काम करण्यास जेव्हापासुन मी सुरुवात केली तेव्हा पासुन पुरुषाबरोबर स्त्रीया ही सहभागी झालेल्या आहेत. स्त्रीयांची प्रगती ज्या प्रमाणात झाली असेल त्यावरुन एखाद्या समाजाची प्रगती मी मोजत असतो. स्वच्छ राहण्यास व सर्व दुर्गुणापासुन मुक्त राहण्यास, मुलांना शिक्षण देण्यास मुलांच्या मनात महत्वाकांक्षा जागृत करण्यास बाबासाहेबांनी सांगितले. लग्न करण्याची घाई न करण्यास सांगितले व सर्वात महत्वाचे म्हणजे लग्न झालेल्या प्रत्येक मुलीने पतीची मैत्रीण म्हणुन त्याच्या प्रत्येक कार्यात सहकार्य द्यावे. मात्र गुलामा सारखे वगण्यास तीने खंबीर पणे

नकार द्यावा व समतेसाठी आग्रह धरण्यास सांगितले. बासाहेबांनी मुलींच्या शिक्षणाची सोय व्हावी म्हणुन औरंगाबाद येथे मिलींद महाविद्यालयाची स्थापना केली तसेच बस सेवा ही सुरु केली."८

१९४२ मध्ये बाबासाहेब व्हाईसराय च्या केंदिय मंत्री मंडळात मजुर मंत्री असतांना बाबासाहेबांनी खाणीत काम करणा-या स्त्रीयांना बाळंतपणाची रजा व ती ही पगारी मिळण्याची सोय करणारे विधेयक संमत करुन घेतले. तसेच कोळ्सा खाणीतील स्त्री मजुरांना पुरुषा ईतकीच मजुरी देण्याचा आदेश काढुन अनेक सवलती दिल्या. खाणीतील कामगार स्त्रीयांच्या बाळांतपणाच्या रजेसंबंधी महत्वाचे विधेयक बाबासाहेबांनी १९४५ मध्ये मंजुर करुन घेतले स्त्री व पुरुष मजुरांच्या दहा तासांचा दिवस कमी करुन आठ तासांचा दिवस करणारे महत्वाचे विधेयक संमत करुन भारतीय मजुरांच्या आणि स्त्रीयांच्या जिवनात क्रांतीकारी सुधारणा घडवुन आणली. कामगार व स्त्री मजुरांच्या सर्व खात्यामध्ये आमुलाग्र परिवर्तन घडविणा-या अनेक सुधारणा अंमलात आणल्या. "६ डिसेंबर १९४५ मध्ये सेक्रेटिएट मध्ये लेबर प्रा.कमिश्नर्स सल्लागार व इतर अधिकारी यांच्या परिषदेच्या मुंबईत उद्घाटन प्रसंगी बाबासाहेब म्हणाले कि कामगार हा मनुष्य आहे व मानवाचे जे हक्क आहेत ते कामगाराला असणे जरुरीचे आहे"९

अशा प्रकारे पुरुष व महिला कामगारांच्या मानवी हक्कांबद्दल हि बाबासाहेबांना तळमळ होती त्यासाठी त्यांनी कामगार मंत्री असतांना स्त्री कामगारांना अनेक सोयी, सुविधा मिळ्वुन देउन स्त्री कामगारांचे कल्याण केले.

बाबासाहेबांनी भारतीय संविधानाच्या माध्यमातुन स्त्री वर लादलेली हजारो वर्षापासुनची आर्थिक, सामाजिक गुलामगीरी कायद्याद्वारे नष्ट केली. संविधानातील भाग-3 मधील आर्टिकल १४ ते १८ मध्ये समानतेच्या अधिकारानुसार कायद्यापुढे सर्व समान व सर्वांना समान संरक्षण देण्यात आले. धर्म, वंश, जात्, लिंग, जन्मस्थान या कारणावरुन भेदभाव करण्यास मनाई करण्यात आली तसेच आर्टिकल १९ ते २२ नुसार स्वातंत्र्याचा ज्या मध्ये जिवीत राहण्याचा व व्यक्तिगत स्वातंत्र्याचा अधिकार देण्यात आला तसेच आर्टिकल २३

ते २४ मध्ये शोषणाविरुध्द्चा अधिकार देण्यात आला. आर्टिकल २५ व २६ नुसार धर्मस्वातंत्र्याचा अधिकार ही देण्यात आला व आर्टिकल ३२ नुसार संविधानिक उपायांचा अर्थात भारताच्या सर्वोच्च न्यायालयात थेट वरिल मौलिक अधिकारांच्या उल्लंघनाविरुध्द दाद मागण्याचा अधिकार देण्यात आला.

"२५ डिसेंबर १९५२ रोजी कोल्हापुर येथे स्त्रियांच्या नऊ संस्थातर्फे आयोजित मानपत्र समारंभात बाबासाहेबांनी स्त्रीयांच्या विनंतीवरुन हिंदु कोड बिलात स्त्रीयांना कोण कोणते हक्क दिले आहेत व काय तरतुदी केल्या होत्या या विषयी सुबोध रितीने विवेचन केले"१०

स्त्रीयांनी आपल्या हक्कासाठी मनोदौर्बल्य टाकुन कंबर कसुन पुढे आले पाहिजे.

"स्त्रीयांना समाजात समानतेचा दर्जा मिळावा समाजात प्रतिष्ठा, अधिकार प्राप्त व्हावेत,स्त्रीयांच्या उध्दारासाठी, कल्याणासाठी बाबासाहेबांनी २१ सप्टेंबर १९५१ रोजी लोकसभेत **"हिंदु कोड बील"** चार वर्ष रात्रंदिवस कष्ट करुन मोठ्या मेहनतीने मांडले हि भारताच्या ईतिहासातील एक फार मोठी ऐतीहासिक घटना मानली जाते. केवळ दलित बहुजन नव्हे तर भारतातील संपुर्ण स्त्री वर्गाच्या स्वातंत्र्याचा मार्ग बाबासाहेबांच्या हिंदु कोड बीलामुळे मोकळा झाला.मनुस्मृतीसारख्या ग्रंथांनी स्त्रीयांचे सर्व प्रकारचे हक्क नाकारले होते ती समाजात पुरुष प्रधान समाज व्यवस्थेच्या दावणीला बांधलेल्या जनावरासारखी गुलाम होती तीला कौटुंबिक, सामाजिक सन्मान नव्हता केवळ दु:ख अन्याय, अत्याचार वाट्याला होता तो दुर करण्यासाठी मानवतावादी बाबासाहेबांनी हिंदु कोड बील लोकसभेत मांडले.

परंतु भारतातील पुरुषप्रधान व सनातनी मनोवृत्तीच्या लोकप्रतीनिधींना स्त्रीयांचे स्वातंत्र्य रुचले नाही त्यांनी हिंदु कोड बीलाला कडाडुन विरोध केला. या बिलामुळे ख-या अर्थाने स्त्री स्वतंत्र होणार होती. कायद्याने स्त्रीयांना हक्क, अधिकार, दर्जा व प्रतिष्ठा मिळावी हे बाबासाहेबांचे स्वप्न होते. या बिलात एकुण सात भाग होते.

१) स्त्रीयांना मालमत्तेचा वडीलोपार्जित अधिकार

२) मृताचा वारसदार ठरविण्याचा अधिकार

३) पोटगी

४) विवाह

५) घटस्फोट

६) घटस्फोट

७) दत्तक विधान

८) अज्ञानत्व व पालकत्व

लोकशाहीविरोधी व पुराणमतवादी वृत्तीच्या विरोधामुळे बील मंजुर झाले नाही त्यामुळे बाबासाहेब खुप दु:खी झाले व त्यांनी २७ सप्टेबर १९५१ मध्ये रोजी आपल्या केंद्रिय कायदा मंत्री पदाचा तडकाफ़डकी राजीनामा दिला. स्त्रीयांच्या अधिकारासाठी, कल्याणासाठी, उध्दारासाठी आपल्या केंद्रिय मंत्री पदाचा तडकाफडकी राजीनामा देणारे बाबासाहेब संपुर्ण भारतात आजपर्यंतच्या ईतिहासात एकमेव नेते आहेत. पुढे हेच बिल बाबासाहेबांचे विचार, ध्येय सरकारच्या लक्षात आल्यावर टप्प्या टप्प्यात मंजुर झाले व भारताच्या शतकानुशतकाच्या इतिहासाला हिंदु कोड बिलामुळे एक ऐतिहासिक वळण मिळाले”११

आज हिंदु कोड बिलाचे चार कायद्यात रुपांतर झाले आहे.

१) हिंदु विवाह कायदा- १९५५

२) हिंदु दत्तक व निर्वाह अधिनियम-१९५६

३) अज्ञानत्व व पालकत्व अधिनियम- १९५५

४) हिंदु उत्तराधिकारी अधिनियम-१९५६

आणि कौटुंबिक हिंसाचाराचा कायदा-२००५ यात हिंदु कोड बिलाचे प्रतिबिंब पाहण्यास मिळते.

## समारोप / सारांश (Conclusion) :-

भारतातील स्त्रीमुक्ती चळवळीला तात्विक अधिष्ठान बाबासाहेबांनी हिंदु धर्म व पुराणाची सखोल व परखड चिकित्सा करुन मिळवुन दिले. स्त्री सुध्दा एक व्यक्ति आहे. केवळ उपभोगाची वस्तु नसुन "**मानव**"**(Human)** आहे अशा आदर्शवादी भुमिकेपर्यंत ते थांबलेच नाही तर भारतातील स्त्री दास्याचे मुळ शोधुन काढले स्त्रीयांच्या गुलामगिरीचा व अस्पृश्यता, जातीयता व वर्णवादाचा संबंध स्पष्ट केल. तसेच स्त्रीयांच्या दुर्द्शेस कारणीभुत असलेल्या अंधश्रध्देचे मुळ हिंदु पुराणे व महाकाव्यात कसे आहे हे सप्रमाण सिध्द केले.

भारतातील स्त्रीयांना त्यांचे **नैसर्गिक मानवी हक्क** मिळ्वुन द्यायला बाबासाहेबांनी मोठा संघर्ष केलेला दिसुन येतो. "बाबासाहेबांनी स्त्रीयांसाठी केलेल्या संविधानात्मक तरतुदिमुळेच स्त्रीयांच्या आयुष्याला नवसंजिवनी प्राप्त झाली आहे. गलितगात्र झालेल्या स्त्रीयांना हक्क आणि अधिकाराचे अमृतजल बाबासाहेबांनी पाजले आणि आज त्या जीवनाच्या विविध क्षेत्रात चमकदार कामगिरी करतांना दिसुन येत आहेत.ज्या स्त्रीला समाज, अर्थ, धर्म, राजव्यवस्थेत कसलेही स्थान आणि दर्जा नव्हता अशा स्त्रीयांना बाबासाहेबांनी संविधानात्मक दर्जा प्राप्त करुन समाजात सन्मान मिळ्वुन दिला. आणि त्यामुळेच आज श्रीमती प्रतीभाताई पाटिल भारताच्या सर्वोच्च राष्ट्र्पती पदावर विराजमान होवु शकल्या. श्रीमती इंदिरा गांधी भारताच्या पंतप्रधान तर श्रीमती किरण बेदी आयपीएस(IPS)पोलिस अधिकारी व श्रीमती सुजाता मनोहर उच्च न्यायालयाच्या न्यायाधिश होवु शकल्या परंतु दुर्दैवाने समाजातील व देशातील काही स्त्रीयांना बाबासाहेबांच्या या प्रचंड उपकाराचा विसर पडलेला दिसुन येत आहे.

आज हि समाजातील व देशातील काही स्त्रीया व्रतवैकल्ये आणि कर्मकांड, सत्यनारायण, लक्ष्मीपुजन, चतुर्थी या सारख्या पुजा अर्चा करण्यात वेळ आणी पैसा घालवतात आजची स्त्री हे विसरुन जाते कि विद्येची देवता सरस्वती असुन ही स्त्रीयांना शिक्षणाचा अधिकार नव्हता. धनाची देवता लक्ष्मी असुन ही पैशावर स्त्रीयांचा कुठल्याही प्रकारचा अधिकार नव्हता. शक्तीची देवता दुर्गा असुनही त्यांना दारुड्या नव-याचा मार खावा लागत होता.स्त्रीयांच्या मदतीसाठी या देवी-देवता कधी धावुन आल्या नाहीत कि कधी त्यांनी त्यांच्या साठी संघर्ष केला नाही."१२

स्त्रीयांना गुलामगीरीतुन मुक्त करण्यासाठी राष्ट्रपिता महात्मा ज्योतीबा फुले, सावित्रीबाई फुले आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी आयुष्यभर अगदी आपल्या शेवटच्या श्वासापर्यंत संघर्ष केलेला दिसुन येतो. तेव्हा कुठे स्त्रीयांना **"माणुस"(Human)** म्हणुन जगण्याचा हक्क प्राप्त झाला आहे. आज भारतातील अखिल स्त्री वर्ग जो सुखी, आनंदी व प्रगतीशील आहे ते केवळ बाबासाहेबांनी संविधानातील केलेल्या तरतुदीमुळेच. ज्या स्त्रीला एके काळी पुरुषाच्या पायाची दासी, नौकर, गुलाम, उपभोगाची वस्तु म्हटले जाई ती आज जीवनाच्या विविध क्षेत्रात **"बॉस"** म्हणुन वावरतांना दिसत आहे. जीला फक्त **चुल आणि मुलच** माहित होते. जीला घराचा उंबरठा ओलांडण्याची मुभा नव्हती ती आज सातासमुद्रापार विदेशात जाऊन पोहोचली आहे.

अस्पृश्य वर्गाच्या प्रबोधनाचे कार्य करीत असतांना स्त्रीयांच्या प्रबोधनास ही बाबासाहेबांनी महत्व दिलेले दिसुन येते. स्त्रीयांच्या प्रबोधनासाठी बाबासाहेबांनी स्वतंत्र परिषदा भरवल्या त्यामुळे स्त्रिया सुध्दा सभा, सम्मेलने, परिषदा, मोर्चे, सत्याग्रहात पुरुषांच्या बरोबरीने सक्रिय सहभागी झालेल्या दिसुन येतात. बाबासाहेबांनी स्त्री वर्गात केलेल्या प्रबोधनाचा मोठा विजय होता.

आज स्त्री पुरुष समानतेचे बाबासाहेबांचे स्वप्न सत्यात उतरतांना भारतात व जगात दिसत आहे.आधुनिक काळात स्त्रीयांची वाटचाल ही आशादायक आहे. बाबासाहेबांनी केलेल्या अथक प्रयत्नांचे हे गोड फळ आहे. असे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे भारतातील स्त्रीयांसाठी महान व श्रेष्ठ असे योगदान आहे.

## संदर्भ व ग्रंथसुची (Refrences/Biblography):-

१) प्रा.मुनघाटे (डॉ.) प्रमोद, ब्रिजेश सिंह(मुख्य संपा) "स्त्री मुक्तीचा उद्गाता" 'लोकराज्य' मासिक एप्रिल 2017 मुंबई पृ.स.10 वरील लेख.

२) देशपांडे-नलावडे भाग्यश्री यांचा "महिला सक्षमीकरणामध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे योगदान"नावाचा 'दक्षता'मासिक मुंबई मधिल एप्रिल-2012 पृ.स.32 वरील लेख.

३) प्रा.पगारे(डॉ.)प्रशांत यांचा “स्त्रीमुक्तिचा उद्‌गाता” ‘पुण्यनगरी’ वर्तमानपत्रातील 13 मार्च 2016 मधिल पृ.स.16 वरील लेख.

४) लेंडे(डॉ.)शैलेंद्र यांचा “युगप्रवर्तक जयंतीविशेषांक मधिल “डॉ.आंबेडकरांच्या स्त्रीमुक्तीवादी अर्थचिंतनाचे जागतीकीकरणाच्या कालखंडातील महत्व” नावाचा एप्रिल-2012 पृ.स.41 वरील लेख.

५) प्रा.निकुंभे(डॉ.) सी.एच. “समाजप्रबोधनकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर”, सुगावा प्रकाशन पुणे 2005 पृ.स. 163 ते 165

६) मुन वसंत व हरी नरके (संपा) डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची भाषणे खंड- 18,भाग-1 (1920-1936) “अस्पृश्योन्नती व स्त्रीयांची जबाबदारी” ‘डॉ.बाबासाहेब आंबेडकर’ चरित्र साधने प्रकाशन समिती, महाराष्ट्र शासन, मुंबई पृ.स. 142

७) डाहाट(डॉ.) धनराज(संपा) ‘डॉ.बाबासाहेब आंबेडकर भाषणे आणि विचार’, खंड-1 “स्त्री” संकेत प्रकाशन, नागपुर वर्ष-2011 पृ.स. 15 ते 17

८) मुन वसंत व हरी नरके (संपा) डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची भाषणे खंड- 18,भाग-2, “स्त्रीयांच्या प्रगती वरच समाजाची प्रगती अवलंबुन” ‘डॉ.बाबासाहेब आंबेडकर’ चरित्र साधने प्रकाशन समिती, महाराष्ट्र शासन, मुंबई पृ.स. 197.

९) कित्ता - पृ.स. 226

१0) कित्ता-खंड-18 भाग-3 पृ.स. 340

११) प्रा.मुनघाटे (डॉ.) प्रमोद, ब्रिजेश सिंह(मुख्य संपा) “स्त्री मुक्तीचा उद्‌गाता” ‘लोकराज्य’ मासिक एप्रिल 2017 मुंबई पृ.स.10 व 11वरील लेख.

१२) प्रा.लोंढे-सरपे(डॉ.) अनिता यांचा “हिंदु कोड बिल स्त्री मुक्तिचा मार्ग” नावाचा दैनिक वृत्तरत्न सम्राट,मुंबई वर्तमानपत्रातील 14 एप्रिल 2016 पृ.स. 42 वरिल लेख.